**अंध, अस्थीव्यंगाने अधू आणि कण्याच्या विकाराने पीडित असणारे राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना वाहतूक भत्ता मंजूर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन निर्णय क्रमांक: वाहभ-१००३/प्र.क्र.६४/सेवा-५
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
**दिनांक : २ ऑगस्ट, २००४**

पहा:
(१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: टीआरए-१३७९/सीआर-१७३७/एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी, १९८०.
(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: टीआरए-१०८३/प्र.क्र.१३७५/एसईआर-५, दिनांक ४ जानेवारी, १९८४.
(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक:टीआरए-१३८३/सीआर-१४५४/एसईआर-५, दिनांक १० जानेवारी, १९८४.
(४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:विवाभ-१३८८/सीआर-६८०/सेवा-५, दिनांक ८ मार्च, १९८९.
(५) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:विवाभ-१३९०/प्र.क्र.३६१/सेवा-५, दिनांक २० एप्रिल, १९९०.
(६) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:वाहभ-१०९८/प्र.क्र.८३/९८/सेवा-५, दिनांक १४ डिसेंबर, १९९८.
(७) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग क्रमांक: वाहभ-१०९८/प्र.क्र.८३/९८/सेवा-५, दिनांक ६ जानेवारी, १९९९.
(८) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: वाहभ-१०९९/प्र.क्र.८२/९९/सेवा-५, दिनांक ७ सप्टेंबर, १९९९.
(९) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक:वाहभ-१३००/प्र.क.५७/सेवा-५, दिनांक ४ जून,२००१.
(१०) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक:वाहभ-१०९९/प्र.क.४५/सेवा-५, दिनांक ९ मे, २००३.

**<u>शासन निर्णय</u>**

अंध, हातापायाच्या विकलांगतेसहित अस्थीव्यंगामुळे अधू किंवा कण्याच्या विकाराने पीडीत असलेले राज्य शासकीय कायम आस्थापनेवरील (कार्यव्ययी आस्थापनेसह) कर्मचारी व इतरांना उपरोल्लिखित अ.क्र.६ येथील आदेशानुसार विशेष वाहनभत्ता बंद करुन त्याऐवजी त्यात विहीत केलेल्या अटींच्या अधीन राहून, सर्वसाधारण कर्मचा-यांसाठी विहित करण्यात आलेल्या दराच्या दुप्पट दराने वाहतूक भत्ता मंजूर करण्यात आला आहे. मात्र, कर्तव्यस्थानापासून एक किलोमिटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांचा एकच परिसर असेल अशा ठिकाणी राहणा-या कर्मचा-यांना हा भत्ता सर्वसाधारण कर्मचा-यांसाठी लागू असणा-या दरानेच मंजूर करण्यात आला आहे.

रोटा प्रिंट/एच–564(8000+30–8–04)1

२. उपरोल्लिखित कर्मचा-यांच्या वाहतूक भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याची मागणी काही काळ शासनाच्या विचाराधिन होती. शासन आता असे आदेश देत आहे की, अंध, हातापायाच्या विकलांगतेसहित अस्थीव्यंगामुळे अधू किंवा कण्याच्या विकाराने पीडीत असलेले राज्य शासकीय कायम आस्थापनेवरील (कार्यव्ययी आस्थापनेसह) कर्मचारी व ज्यांना यापूर्वी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वाहतूक भत्ता मंजूर करण्यात आला आहे अशा इतर कर्मचाऱ्यांना अ.क्र.६ येथील शासन निर्णयातील परिच्छेद २ (पाच) मध्ये विहित केलेल्या दरांऐवजी खालील तक्त्यात दर्शविलेल्या दराने वाहतूक भत्ता मंजूर करण्यात यावा.

| अ. क. | कर्मचा-याची वेतनश्रेणी | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रुपये) | |
|---|---|---|---|
| | | "अ-१" आणि "अ" वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
| १ | रु.८०००-१३५०० किंवा त्याहून वरच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी. | १,६०० | ८०० |
| २ | रु.६५००-१०५०० किंवा त्याहून वरच्या परंतू रू.८०००-१३५०० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी. | ८०० | ५०० |
| ३ | रु.६५००-१०५०० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी. | ५०० | ५०० |

१) अपंगत्वासंबंधी यापूर्वी विहीत करण्यात आलेल्या अटींसह उर्वरित अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून वरीलप्रमाणे वाहतूक भत्ता मंजूर करण्यात येईल.

२) कर्तव्यस्थानापासून एक किलोमिटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांचा एकत्र परिसर असेल अशा ठिकाणी राहणा-या कर्मचा-यांना वरील तक्त्यात नमूद केलेल्या दराच्या निम्म्या दराने, मात्र अशा प्रकारे दर निम्मा केल्याने तो रु.५००/- पेक्षा कमी होत असल्यास, किमान रु.५००/- या दराने वाहतूक भत्ता मंजूर करण्यात येईल.

३) ज्या कर्मचा-यांना शासकीय वाहन पुरविलेले आहे त्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

४) हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शु.श.कारेकर**
शासनाचे उपसचिव.

प्रति,

महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब,मुंबई /पुणे / नागपूर/ औरंगाबाद/नाशिक/ अमरावती.

एच-564(8000+30-8-04)1अ

महालेखापाल-२(लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
मंत्रालयीन सर्व विभाग
सर्व विभागीय आयुक्त
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*सहसंचालक, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
नगरविकास विभाग, युडी-१०,मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय (२० प्रती)
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई.
संचालक, आदिवासी संशोधन व शिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आदिवासी विकास आयुक्त, नाशिक.
सर्व विभागातील समाजकल्याण अधिकारी.
अपर आयुक्त, आदिवासी उपयोजना, नाशिक/नागपूर.
सर्व समाजकल्याण अधिकारी, वर्ग-१
सर्व आदिवासी कल्याण अधिकारी.
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्प.
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब,कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (४० प्रती)
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (१००प्रती)
संचालक, तांत्रिक प्रशिक्षण, द्वारा तंत्र शिक्षण संचालक, मुंबई (२५०प्रती)
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व जिल्हापरिषदांचे शिक्षणाधिकारी
आयुक्त, महानगरपालिका, नागपूर
प्रशासकीय अधिकारी, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालिका शिक्षण मंडळे (पुणे/ कोल्हापूर/ सोलापूर या महानगरपालिकांची शिक्षण मंडळे यांसह)
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी / देहूरोड/ देवळाली/ अहमदनगर.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक(१० प्रती)
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती.
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.
अधीक्षक, वेतन पथक, सर्व जिल्हे.
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उत्तर, दक्षिण व पश्चिम विभाग)
सर्व कन्याशाळा निरिक्षिका.
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग)
शिक्षण अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका.
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
सर्व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन.
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड फाईल, वित्त विभाग / सेवा-५

* पत्राद्वारे

एच-564(8000+30-8-04)2.